ARTHA Poona 4.

अर्थशास्त्र, व्यापार, उद्योगधंदे, बँकिंग, सहकार, इत्यादि विषयांस वाहिलेलें एकमेव मराठी साप्ताहिक
स्थापना : १९३५

# अर्थ

'अर्थ एव प्रधानः' इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति।
—कौटिलीय अर्थशास्त्र

प्रत्येक बुधवारीं प्रसिद्ध होतें.
वर्गणीचे दर :
वार्षिक : ६ रु.
सहामाही : ३ रु.
किरकोळ : २ आ.
दुर्गाधिवास, पुणें ४.

LICENCED TO POST WITHOUT PREPAYMENT
Reg. No. B. 3434. Licence No. 53.

वर्ष १९ | पुणें, बुधवार तारीख १४ आक्टोबर, १९५३ | अंक ४१

## विविध माहिती

**अमेरिकन चित्रपटाला बंदी**—अमेरिकेच्या सुप्रसिद्ध मेट्रो-गोल्डविन कंपनीनें तयार केलेला 'दि नेकेड स्पर' ह्या नांवाचा चित्रपट दाखविण्यास भारत सरकारनें देशभर बंदी केली आहे. चित्रपट हिंदुस्थानांत दाखविण्यास अयोग्य आहे, असें सरकारचें मत असल्याचें समजतें.

**चार्ली चॅपलिनच्या स्टुडिओची विक्री**—सुप्रसिद्ध अमेरिकन नट व दिग्दर्शक मि. चार्ली चॅपलिन ह्यांचा हॉलिवुडमधील स्टुडिओ २,५०,००० डॉलर्सला विकण्यांत आला. स्टुडिओला जितकी किंमत यावी अशी त्यांची अपेक्षा होती, तीपेक्षा निम्म्याहून थोडी अधिक अशी ही किंमत आहे. ज्या अमेरिकन कंपनीनें स्टुडिओ विकत घेतला, तिनें त्याचा कांहीं भाग टेलिव्हिजन कंपनीसाठी भाड्यानें दिला आहे.

**पेन्सिली तयार करण्याचें यंत्र**—लखनौ येथील सरकारी मालकीच्या कुलुपाच्या कारखान्यांत पेन्सिली तयार करण्याचें एक यंत्र बनविण्यांत आलें आहे. त्याची किंमत अवघी २५० रुपये असून तें हातानें चालवितां येतें. ह्या यंत्राच्या साह्यानें उत्तर प्रदेशांतील ग्रामोद्योगाच्या प्रकारांत आणखी एका प्रकारची भर घालतां येण्यासारखी आहे.

**ओरिसामधील शेतकी कॉलेज**—ओरिसाच्या राजधानीजवळ पुढील वर्षीं पहिल्या प्रतीचें एक शेतकी कॉलेज काढण्यांत येणार आहे. त्यासाठी २१ लाख रुपये खर्च येणार आहे. ह्या खर्चापैकीं १७ लाख रुपये भारतीय सरकार खर्च करणार असल्याचें समजतें. त्याशिवाय शेतकीच्या तीन शाळाहि काढण्यांत येणार आहेत.

**जगाचा नवा नकाशा**—१८९१ सालीं जगांतील बहुतेक देशांनीं मिळून पृथ्वीचा एक खूप मोठा नकाशा तयार करण्याचें ठरविलें होतें. १ इंचाला १६ मैल, ह्या प्रमाणानें तो तयार करण्यांत येत आहे. नकाशांत रस्ते व रेल्वे सुद्धां दाखविण्यांत येतील. आतां हें काम संयुक्त-राष्ट्र-संघटनेनें आपल्याकडे घेतलें आहे. जमिनींच्या भागांचा नकाशा करण्यासच १,००० कागद लागतील.

**रशिआची शास्त्रीय प्रगति**—प. युरोपमधील राष्ट्रांना गरज लागल्यास रशिआ अगदीं नव्या प्रकारची यंत्रसामुग्री पुरवूं शकेल अशी वार्ता प्रसिद्ध झाली आहे. १९४९ ते ५१ ह्या तीन वर्षांत रशिआनें १,६०० नव्या प्रकारचीं यंत्रें व युक्त्या शोधून काढल्या असा दावा करण्यांत येत आहे.

**जपानकडून खताची आयात**—जपानकडून भारतानें मागविलेलें ९०० टन अमोनिअम नैट्रेट हें खत मुंबई बंदरांत आलें आहे. भारतीय सरकारच्या अन्न व शेती खात्यासाठीं तें राखून ठेवण्यांत आलें आहे.

**प्लॅस्टिकची बायसिकल**—आमस्टरडॅम येथील एका डच इंजिनिअरनें अवघ्या १६ पौंड वजनाची प्लॅस्टिकची बायसिकल बनविली आहे. ह्या सायकलींचें उत्पादन मोठ्या प्रमाणावर सुरू झाल्यावर जगाची बाजारपेठ त्यांनीं भरून जाईल, असें त्याचें म्हणणें आहे. सायकलींचा नमुना एका अमेरिकन कंपनीकडे पाठविण्यांत आला असून ती कंपनी लवकरच उत्पादनाला प्रारंभ करणार आहे.

**अणुशक्तीवर चालणारी पाणबुडी**—पुढील वर्षाच्या जानेवारीच्या २१ तारखेला प्रे. ऐसेनहोअर ह्यांच्या पत्नी अणुशक्तीवर चालणाऱ्या पहिल्या पाणबुडीचा जलवितरणसमारंभ साजरा करणार आहेत. ह्या बोटीला साध्या पाणबुडीपेक्षा दुप्पट म्हणजे सुमारें १ कोटी डॉलर्स खर्च आला आहे. तिला इंधन घेण्याची जरूर लागणार नाहीं. खलाशी पाण्याखालीं जितका वेळ राहूं शकतील तितकी तीहि राहूं शकेल.

**उत्तर-प्रदेशाची आरोग्ययोजना**—उत्तर-प्रदेशामधील लोकांचें आरोग्य सुधारावें म्हणून राज्य सरकारनें एक विस्तृत योजना आंखली आहे. ह्या योजनेनुसार प्रत्येक खेड्यांत एक फिरतें रुग्णालय ठेवण्यांत येणार आहे. आरोग्ययोजनेला अंदाजें १ कोटी रु. खर्च येईल असें समजतें.

**बेकारांना नबाबाची मदत**—भोपाळच्या नबाबांनीं राज्यांतील बेकारांना मदत करण्यासाठी स्वतःच्या खाजगी पैशामधून १ लाख रुपये खर्च करण्याचें ठरविलें आहे. ज्या बेकारांना छोटे उद्योगधंदे काढावयाचे असतील त्यांना वरील रकमेंतून बिनव्याजी कर्ज देण्यांत येणार आहे.

**संयुक्त-राष्ट्र संघटनेचा नौकरवर्ग**—संयुक्त-राष्ट्र-संघटनेच्या एकूण नौकरवर्गाची संख्या सुमारें ४,६०० असून त्यांपैकी ३,३६९ नौकर न्यूयॉर्कमधील मुख्य कचेरींत काम करतात. बाकीचे नौकर जगभर पसरलेले आहेत.

**संयुक्त-राष्ट्र-संघटनेची वर्गणी**—गेल्या महिन्याच्या मध्यापर्यंत संयुक्त-राष्ट्र-संघटनेच्या सभासद-राष्ट्रांपैकी २४ देशांनीं आपली १९५३ सालची संपूर्ण वर्गणी दिलेली होती. परंतु ३६ सभासद राष्ट्रांकडून सुमारें १ कोटी डॉलर्स वर्गणी यावयाची होती. सो. रशिआकडून एकूण ५४,२७, ७३० डॉलर्स वर्गणीपैकी २९,४९,४५२ डॉलर्स वर्गणी यावयीची होती. रशिआचे खालोखाल चीनची वर्गणी थकली होती.

**माहिती खात्याच्या खर्चांत कपात**—चालू फडणिशी वर्षांत ब्रिटनचें सरकार माहिती-खात्यावर १,२२,३७,२५० पौंड खर्च करणार आहे, असा अंदाज करण्यांत आला आहे. गेल्या फडणिशी वर्षापेक्षा हा खर्च २,०३,४५० पौंडांनीं कमी आहे.

# कण आणि क्षण

## ( सुखी जीवनाच्या पाऊलवाटा )

[ लेखकः—श्री. वा. काळे, संपादक, "अर्थ" पृ. सं. १६०. किं. २॥ रु. ]

### " कर्मयोगाचे सुबोध धडे "

"सौंदर्य वस्तूंत नसतं तर पहाणाऱ्याच्या दृष्टींत असतं, व ज्याला सौंदर्यदृष्टि असते त्याला आजूबाजूस मुबलक सौंदर्य आढळतं. याप्रमाणेंच सुख संसारांत नाहीं—श्रीमंतींत नाहीं, गरिबींत नाहीं!—तर तें संसार करणाऱ्याच्या दृष्टींत आहे, व ज्याला सुख घ्यावं कसं आणि द्यावं कसं हें कळतं तो स्वतःचा संसार तर नेटका आणि सुखाचा करतोच पण इतरांच्या जीवनांतहि समाधान व आनंद निर्माण करतो. कौटुंबिक आणि सामाजिक जीवन म्हणजे एकप्रकारचा 'सहकारी व्यवसाय' आहे. सर्वांचं सुख वाढावं यासाठी सर्वांनीं एक विवक्षित दृष्टि ठेवावयास हवी. "कणाकणाचा व क्षणाक्षणाचा योग्य विनियोग करण्याचा" 'कर्मयोग' सर्वांनीं शिकावयास हवा. या कर्मयोगाचे सुबोध धडे श्रीयुत श्री. वा. काळे (संपादक "अर्थ") यांनीं सोप्या भाषेत आणि मार्मिक पद्धतीनं दिले आहेत. त्यांचं हें पुस्तक मला आवडलं. सर्वांना आवडेल आणि उपयुक्त वाटेल असा भरंवसा मला वाटतो."

पुणें, ता. ८–१०–१९५२ ना. सी. फडके

### " प्रपंच–रहस्याच्या चित्ताकर्षक सूचना "

"मोठमोठ्या विषयांवर ज्याप्रमाणें ग्रंथांची आवश्यकता समाजास असते त्याप्रमाणेंच बारीक विषयांवरील पुस्तकांचीहि असते. ध्वनि–प्रकाश–लहरींचें सांगोपांग विवेचन करणारा ग्रंथ वैज्ञानिकांच्या उपयोगासाठीं हवा असतो तर रेडिओ दुरुस्तीची माहिती देणारें पुस्तक सामान्य वाचकाच्या उपयोगासाठीं पाहिजे असतें. राज्यशासन ग्रंथ अभ्यासकांसाठीं हवा असतो तसें एकादें दैनंदिन गृहजीवन व्यवस्थित व सुखी करण्यास शिकविणारें सोपें मनोरंजक पुस्तक सामान्य प्रापंचिकाला मार्गदर्शनार्थ अवश्य पाहिजे असतें. सुमारें ४०–४५ वर्षांपूर्वीं वि. कों. ओक यांनीं प्रपंचरहस्य नांवाचें असें सुंदर पुस्तक लिहिलें होतें व त्यानें त्या काळांत मार्गदर्शनाचें काम चांगलें केलें. पण प्रपंचाचा प्रपंच गेल्या १०–१५ वर्षांत इतका पसरला आहे कीं एकादें अद्ययावत् पुस्तक पाहिजे होतें व त्याची वाण "कण आणि क्षण" या सुंदर छोट्या पुस्तकानें भरून काढली आहे. या पुस्तकाचें वाचन करून त्यांत चित्ताकर्षक पद्धतीनें दिलेल्या सूचनांचें अनुकरण करणारें माणूस खरोखर व्यवहारचतुर, लोकप्रिय आणि सुखी झाल्याशिवाय रहाणार नाहीं."

पुणें, ता. १२–१०–५२ चिंतामण विनायक जोशी

### " सुबोध, व्यावहारिक व पटणारें विवेचन "

"आचार, विचार व उच्चार, यांतूनच मनुष्याचें मोठेपण व्यक्त होत असतें. यांत सावधानता न ठेवल्यानें बारिकसारिक कारणांनेंहि गैरसमज निर्माण होतात; स्नेह तुटतात, आप्तेष्ट दुरावतात, आणि संस्थाहि दुभंगतात! या साध्या वाटणाऱ्या विषयाचें, इतकें सुबोध, व्यावहारिक व कोणासहि पटणारें विवेचन हा या पुस्तकाचा विशेष गुण आहे. लेखकाचें सूक्ष्म अवलोकन कौतुकास्पद वाटतें."

पुणें, ११–१०–५२ सौ. इंदिराबाई देवधर

### " नव्या जगांतील संसाराचें उपयुक्त व उद्बोधक गाइड "

"आमच्या कौटुंबिक व सामाजिक जीवनांत गेल्या दोन तीन पिढ्यांत फार मोठा बदल झाला आहे. संयुक्त कुटुंबें गेलीं व कर्तीं माणसें आपली बायको व एक-दोन मुलें यांसह जेथें नोकरी मिळेल तेथें राहूं लागली. मुली शिकूं लागल्या, नोकऱ्या करूं लागल्या, आईबापांस व कधीं कधीं नवऱ्यास पोसूं लागल्या. जुने संकेत, जुन्या निष्ठा, जुन्या जबाबदाऱ्या गेल्या पण त्यां ऐवजीं नव्या जबाबदाऱ्या व समस्या आल्या. जुनी राहणी गेली पण जुन्या संवयी, चालीरीती, शिष्टाचार अद्याप गेले नाहींत, व त्यामुळें आमच्या तरुण पिढीच्या हातून चुका घडतात व जीवनांत नवे संघर्ष निर्माण होतात.

"माझे मित्र श्री. श्री. वा. काळे यांनीं या छोट्याशा पुस्तकांत नव्या पिढीचें फार यशस्वी रीतीनें मार्गदर्शन केलें आहे. अलिकडे नवीन शहरें पाहण्यासाठीं गाइडचीं पुस्तकें मिळतात. त्याचप्रमाणें नव्या जगाच्या नव्या संसारांत कसें वागावें व कसें वागूं नये, याविषयींचें "कण आणि क्षण" हें एक अत्यंत उद्बोधक असें गाईड आहे. श्री. काळ्यांचें अवलोकन सूक्ष्म आहे, त्यांचे निष्कर्ष योग्य व अनुभवसिद्ध आहेत आणि सूचना मार्मिक आहेत. पुरुष असून बायकांच्या दैनंदिन जीवनाविषयीं त्यांची माहिती इतकी विपुल व साधार आहे कीं, त्यांचें कौतुक करावेंसें वाटतें.

"कण व क्षण" या पुस्तकाला वाङ्मयाच्या दृष्टीनेंहि महत्त्व आहे. पुस्तकाची भाषा ओघवती व सडेतोड आहे आणि मधून मधून त्यांत डोकावणारा विनोद मिस्किल व सुंदर आहे. हें पुस्तक म्हणजे मागें पडलेल्या लघुनिबंधांचा एक उत्तम नमुना आहे. एक सुंदर व उपयुक्त पुस्तक लिहिल्याबद्दल मी श्री. श्री. वा. काळे यांचें प्रेमपूर्वक अभिनंदन करतों."

"सुषमा" पुणें ४ } वि. द्. घाटे
११-१०-५२ }

### " मनरंजनाबरोबर विचारांत महत्त्वाची भर "

"जगांत बरींच माणसें दुःखीकष्टी दिसतात, तीं त्यांच्या वांटयाला सुखाचा भाग कमी आलेला असतो म्हणून नव्हे, तर स्वतःच्या आयुष्यांतून सुख कसें वेंचावें हें त्यांना ठाऊक नसतें. यामुळें प्रत्येक फुलांत मध असला तरी रातकिड्याला तो मिळत नाहीं, मधमाशीच तो गोळा करूं शकते. त्याचप्रमाणें आपण हें ओळखलें पाहिजे कीं, सुख ही एखादी स्वतंत्र वस्तु नसून आयुष्याच्या प्रत्येक क्षणाला त्याचे सूक्ष्म परमाणू चिकटलेले असतात, ते कणाकणानें गोळा करतां येणें हीच आयुष्य सुखी करण्याची गुरुकिल्ली आहे.

"तेवढ्यासाठीं एखादी बाब लहान असो, मोठी असो, तिचा समतोल व व्यापक दृष्टीनें मनुष्याला विचार करतां आला पाहिजे. या प्रकारच्या कांहीं बाबी नमुन्यादाखल घेऊन श्रीयुत श्री. वा. काळे यांनीं त्यांचें "कण आणि क्षण" या त्यांच्या पुस्तकांत उत्कृष्ट विवेचन केलें आहे. वाचकांच्या मनरंजनाबरोबर त्यांच्या विचारांत महत्त्वाची भर घालणारें पुस्तक प्रस्तुत पुस्तक प्रकाशित केल्याबद्दल श्री. काळे यांचें मी मनःपूर्वक अभिनंदन करतों."

ता. १० ऑक्टोबर १९५२ } शं. वा. किर्लोस्कर
किर्लोस्करवाडी }

# अर्थ

बुधवार, ता. १४ आक्टोबर १९५३





संस्थापक :
प्रो. वामन गोविंद काळे

संपादक :
श्रीपाद वामन काळे


## संयुक्त-राष्ट्र-संघटनेच्या तांत्रिक मदतींत खंड

आंतरराष्ट्रीय सहकार्याच्या प्रयोगांत संयुक्त-राष्ट्र-संघटनेनें अंमलांत आणलेला तांत्रिक मदतीचा कार्यक्रम, ही घटना फार महत्त्वाची आहे. पण ह्या तांत्रिक मदतीच्या कामांत खंड पडण्याचीं चिन्हें दिसूं लागलीं आहेत. सध्यां मदतीच्या कार्यक्रमानुसार निरनिराळीं १०० राष्ट्रें आपआपला आर्थिक विकास घडवून आणण्यासाठीं साह्य घेत आहेत. हीं सर्व राष्ट्रें अर्थातच अविकसित अशीं असून, त्या सर्वांत मिळून १,६०० आंतरराष्ट्रीय तज्ज्ञ आपापल्या तंत्रविषयक ज्ञानाचा फायदा तद्देशीय लोकांना देत आहेत. तांत्रिक मदतीच्या कार्यक्रमाची जबाबदारी मुख्यतः अमेरिका, ब्रिटन, कॅनडा व फ्रान्स ह्या चार देशांनीं उचलली आहे. पण गेल्या वर्षी ह्या कार्यासाठीं द्यावयाच्या वर्गणींत अमेरिकेनें कपात केली आहे. एकूण १.२७ कोटी डॉलर्सपैकी फक्त ८० लाख डॉलर्स एवढीच वर्गणी १९५२ सालीं अमेरिकेनें दिली आहे. इतर कांहीं देशांनींहि वर्गणी देण्यांत अशीच कपात केल्यामुळें टेक्निकल असिस्टन्स बोर्डाला आपलें आंथरूण पाहून पाय पसरण्याची वेळ आली आहे. अर्थातच १९५२ सालामधील कांहीं संकल्पित योजना तहकूब कराव्या लागल्या आहेत. मदतीच्या फंडांत कपात करण्यांत आल्यामुळें बहुतेक आशिआई राष्ट्रांना धक्का पोंचणार आहे. मोठ्या उमेदीनें आखण्यांत आलेल्या विकास-योजना त्यांना स्थगित कराव्या लागणार आहेत. भारताचीच गोष्ट घ्यावयाची, तर दामोदर नदीच्या खोऱ्याची जी आर्थिक पहाणी करण्यांत यावयाची होती ती लांबणीवर टाकण्यांत येणार आहे. त्याचप्रमाणें, एक रासायनिक कारखानाहि असाच अनुकूल भविष्य-कालाची वाट पहात बसणार आहे.

पाकिस्तानांत कागदाचा रांधा करण्याचा व कागद तयार करण्याचा कारखाना काढण्यांत येणार होता. आतां तो सध्यां तरी निघत नाही. त्याशिवाय आणखी सहा कारखानेहि लांबणीवर टाकण्यांत आले आहेत. सीलोनमधील कांहीं कारखानेही सध्या काढण्यांत येणार नाहींत. आशिआंतील लोकांना आधुनिक उत्पादन तंत्राचें शिक्षण देण्यासाठी जे आंतरराष्ट्रीय तज्ज्ञ लागतात त्यांची मागणी करण्याचें बोर्डानें स्थगित केलें आहे. त्याच प्रमाणें दुर्लभ चलनाच्या देशांतून यंत्रसामुग्री खरेदी करण्याचेंहि थांबविण्यांत आलें आहे. १९५४ च्या मध्यापर्यंत रोख रकमा देण्याचेंहि थांबविण्यांत आलें आहे. बोर्डाचे अध्यक्ष, मि. डेव्हिड ओवेन, ह्यांनीं संयुक्त-राष्ट्र-संघटनेच्या आर्थिक समितीपुढें सर्व परिस्थिति ठेवली आहे. १९५४ सालीं तांत्रिक मदतीसाठीं लागणारी रक्कम निदान २० टक्क्यांनीं वाढविण्यांत आली नाहीं तर सध्यांचा मर्यादित कार्यक्रम सुद्धां अंमलांत आणणें कठीण होईल, असा इशाराहि त्यांनीं दिला आहे. त्यांच्या मतानें हा मदतीचा कार्यक्रम म्हणजे एक विशेष गोष्ट आहे. कारण, औद्योगिक दृष्ट्या पुढारलेले देश अप्रगत देशांना तर मदत करतातच; पण त्यांतल्या यांत सुद्धां अधिक पुढारलेले देश आपल्या मानानें मागासलेल्या देशांना हात देतात. संयुक्त-राष्ट्र-संघटनेनें आतांपर्यंत ६५ देशांतून कुशल तंत्रज्ञ गोळा करून ते निरनिराळ्या देशांना धाडले आहेत. भारतानें ८४ तंत्रज्ञ संयुक्त-राष्ट्र-संघटनेच्या दिमतीला दिले असून ९१ जणांच्या शिक्षणाची व्यवस्था केली आहे.

---

### वैमानिकांमध्यें सुद्धां बेकारी !

'बी' परवाना असलेल्या वैमानिकांत बेकारी माजूं लागल्यामुळें भारतीय सरकार मास्टर कमिटीच्या शिफारसींचा विचार करूं लागलें आहे. आतांच सुमारें १०० वैमानिक बेकार असून आणखी कांहीं महिन्यांत तितकेच नवे 'बी' परवानेवाले तयार होणार आहेत. भारतामधील विमान कंपन्यांना दरवर्षी नव्या २७ वैमानिकांचे पेक्षा अधिकांची गरज लागत नाहीं, असें समजतें. वैमानिकांची बेकारी दूर करण्यासाठी अनेक सूचना करण्यांत येत आहेत. भारतानें अतिपूर्वेकडील देशांकडे वैमानिक मार्ग सुरू करावे, अशीहि एक सूचना करण्यांत आली आहे. तथापि मास्टर कमिटीनें मुख्य शिफारस केली आहे ती अशी कीं, दरवर्षी ३० पेक्षा अधिक वैमानिकांना शिक्षण देण्यांत येऊं नये. जेथें शक्य असेल तेथें परदेशीय वैमानिकांच्या जागीं हिंदी वैमानिक नेमण्यांत यावे, अशीहि एक शिफारस मास्टर कमिटीनें केली आहे. त्याचप्रमाणें भारतीय वैमानिक दलांत सध्यां 'बी' परवाना असून जे बेकार आहेत त्यांना आधी घेण्यांत यावें, अशी विनंति करण्यांत आली आहे. वैमानिक प्रवासी कंपन्यांखेरीज इतर कांहीं क्षेत्रेंहि ह्या वैमानिकांसाठी सुचविण्यांत आलीं आहेत. भू-प्रदेशांची हवेंतून पहाणी करणें, पिकांवर रसायनांचा फवारा उडविणें, टोळाविरुद्ध मोहीम करणें, मलेरिआचें उच्चाटन करण्याच्या कामीं हातभार लावणें, इत्यादि कामें करण्यासाठी वैमानिकांना विशिष्ट पद्धतीचीं खास विमानें चालविण्याचें शिक्षण देऊनहि बेकारांना नवें क्षेत्र खुलें करतां येईल. सध्यां नौकरीवर असणाऱ्या वैमानिकांचे कामाचे तास कमी करून बेकारांना काम पुरविण्याच्या मात्र सरकार विरुद्ध आहे. एअर ट्रॅफिक कंट्रोल ऑफिसर्स म्हणून त्यांना काम देण्याचाहि सरकार विचार करीत आहे.

---

**उत्तर-प्रदेशांत क्षयरोग्यांसाठी इस्पितळ**—उत्तर-प्रदेश सरकारनें क्षयरोग्यांसाठी एक इस्पितळ बांधण्याचें ठरविलें आहे. इस्पितळाच्या इमारतीसाठी २॥ लाख रुपये खर्च येणार असून तें बनारसपासून ७ मैलांवर असलेल्या सारनाथ ह्या ठिकाणीं काढण्यांत येणार आहे.

**पंचवार्षिक कार्यक्रमाचा अभ्यास**—विद्यापीठांच्या अभ्यासक्रमांत योग्य त्या वर्गांतून भारताच्या पंचवार्षिक कार्यक्रमाच्या अभ्यासाचा समावेश करण्यांत यावा, अशी सूचना भारतीय सरकारनें विद्यापीठांना दिली असल्याचें समजतें. पंचवार्षिक कार्यक्रम यशस्वीपणें पार पाडण्यास विद्यार्थ्यांना त्याचें ज्ञान आवश्यक आहे, असें सरकारचें मत आहे.

## बँकांपुढील कांहीं प्रश्न व अडचणी

पुणें बँकिंग असोसिएशनच्या नेतृत्वाखालीं गेल्या महिन्यांत पार पडलेल्या हिंदी बँकांच्या दुसऱ्या संमेलनाचे प्रसंगीं गतसालप्रमाणें बँकांच्या अडचणींची चर्चा करण्यांत आली. तसेंच बँकिंग विषयक कांहीं महत्त्वाच्या व व्यापक स्वरूपाच्या प्रश्नांविषयीं तज्ज्ञांचें मत अजमावण्यांत आलें. असे प्रश्न पुढीलप्रमाणें होत :

१ बँकांचें राष्ट्रीयीकरण करणें इष्ट व देशहिताचें ठरेल काय ?

२ लहान बँका उपयुक्त ठरतात किंवा कसें ?

३ बँकांतील नोकरवर्गाचा प्रश्न मजुरांच्या चळवळीच्या मार्गानेंच जाऊं देणें इष्ट आहे काय ?

४ हिंदी बँका परदेशीय हुंडणावळीच्या क्षेत्रांत विशेष प्रगति कां करूं शकत नाहींत ?

५ बँकांवरील करपद्धतीबाबत, सध्यांच्या चौकशी समितीकडून कोणत्या अपेक्षा कराव्या ?

बँकांच्या ज्या अडचणींची चर्चा झाली, त्यामध्यें रिझर्व बँकेकडून सध्यां उपलब्ध असलेली पैशाच्या वर्गावर्गाची (रेमिटन्सची) सोय अपुरी असल्याची ही विशेष महत्त्वाची म्हणतां येईल. सरकारी ट्रेझरींमार्फत बँकांना कांहीं मर्यादेपर्यंत रकमा पाठविण्याची सोय रिझर्व बँकेनें करून दिलेली आहे. परंतु ती अद्याप सर्व ठिकाणच्या ट्रेझरींमधून करण्यांत आलेली नाहीं. कांहीं विलीन संस्थानांच्या ठिकाणीं ही सोय अद्याप होणेंची आहे. त्यामुळें बँकांना आपला व्यवहार वाढविण्यास अडचण पडत असते. याचबरोबर शेड्यूल्ड बँकांना दर आठवड्यास मुंबईस मोफत भरणा पाठविण्याची सोय आहे. पण, तशीच सोय मुंबईहून बाहेर कोणत्याहि ठिकाणीं भरणा पाठविण्याबाबत होणें आवश्यक आहे. व्यापारवृद्धि होण्यासाठीं चलनाची ने-आण सौकर्यानें होणें जरुरीचें असतें, व अशी सोय मध्यवर्ती बँकेशिवाय दुसऱ्या कोणाकडूनहि होणें शक्य नसतें. मुंबईस भरणा पाठविण्याची सोय करून देण्यामध्यें, सदर बँकांनीं रिझर्व बँकेकडील ठेवणेच्या किमान निधीची तरतूद करण्याचाच उद्देश असल्याचें समजतें. यासच अनुसरून, जर या बँकांनीं रिझर्व्ह बँकेकडे ठेवणेचा निधि, तिच्याकडे असलेल्या शिलकेपेक्षा कमी ठरत असला तर, साहजिकपणें ही जास्तीची रक्कम बँकांना मोफत परत आणण्याची सोय मिळणें क्रमप्राप्त ठरतें, हें संमेलनाचे अध्यक्ष श्री. वी. टी. ठाकूर यांचें उत्तर समर्पकच वाटण्याजोगें आहे. बँकिंगची सोय विस्तृत करण्याचेंच धोरण रिझर्व बँकेनें स्वीकारलें असल्यानें, ही महत्त्वाची अडचण तिच्याकडून लवकरच दूर होईल अशी उमेद वाटते.

याखेरीज, बँकांना कोर्टांतून त्वरित न्याय मिळणें, नोकर वर्गाच्या शिक्षणाची सोय, इत्यादि बाबतच्या अडचणींच्या झालेल्या चर्चेचा व सुरुवातीस दिलेल्या प्रश्नासंबंधींच्या त्याचप्रमाणें व्यापारी बँका शेतीच्या धंद्यास कोणत्या मार्गानें मदत करीत असतात, या विषयींच्या तज्ज्ञांच्या मतांचा परामर्श पुढें सवडीप्रमाणें घेणेंत येईल.

### शुगर कॉन्फरन्स, हरेगांव

बेलापूर कंपनी हरेगांव येथें ता. १० ते १२ आक्टोबर डेकन शुगर टेक्नॉलॉजिस्ट असोसिएशन या संस्थेचें १० वें अधिवेशन भरलें होतें. सुमारें ४०० प्रतिनिधी उपस्थित होते. ३ दिवस साखरेच्या धंद्यावर संशोधनात्मक असे ५० निबंध चर्चिले गेले. ३१ साखर कारखान्याचे मालक या परिषदेला उपस्थित होते.

### सहकारी चळवळीच्या सुवर्ण-महोत्सवाचा कार्यक्रम

मुंबई प्रांतिक सहकारी इन्स्टिट्यूट, सहकारी चळवळीच्या सुवर्ण महोत्सवानिमित्त त्या चळवळीचा इतिहास व वाढ ह्यांची माहिती देणारें एक पुस्तक प्रसिद्ध करणार आहे. स्थानिक घडामोडींवर भर देणारीं पुस्तकें प्रादेशिक भाषांतून डिव्हिजनल बोर्डें प्रसिद्ध करण्याचा संभव आहे. इंग्रजी, मराठी, गुजराती आणि कानडी भाषांतून लिहिलेल्या निबंधांची स्पर्धा लावण्यांत येईल. इन्स्टिट्यूट एक प्रदर्शनहि भरवील. "सहकाराचीं पन्नास वर्षें" ह्या विषयावर चर्चेचा कार्यक्रम होईल. करमणूक किंवा नाटक ह्यांचाहि महोत्सवांत अंतर्भाव होईल. २५ मार्च, १९५० रोजीं व त्यानंतरच्या दोन दिवशीं सर्व सहकारी संस्थांनीं आपल्या इमारतींवर रोषणाई करावी, अशी इन्स्टिट्यूटची विनंती आहे.

### खंडकरी शेतकऱ्यांस दर एकरीं ५० रु. मिळणार

खंडकरी शेतकरी व बेलापूर साखर कंपनी ह्यांचेमध्यें जमिनींच्या खंडासंबंधीं तंटा उपस्थित झाला होता. त्यासाठीं मुंबई सरकारनें नगरचे कलेक्टर, श्री. एफ. एन. राणा ह्यांना आर्बिट्रेटर नेमलें होतें. त्यांनीं २९ मार्च रोजीं, खंडकरी शेतकरी व कंपनी ह्यांच्या प्रतिनिधींच्या संयुक्त सभेंत आपला अवार्ड जाहीर केला, तो शेतकऱ्यांनीं तात्काळ मान्य केला. कंपनीच्या प्रतिनिधींनीं मात्र त्यांचें मत दिलें नव्हतें. ७ ऑक्टोबर रोजीं कंपनीच्या डायरेक्टरांनीं त्यांच्या खास बोलाविलेल्या सभेंत, हा अवार्ड मान्य करण्याचें ठरविलें. आतां दोन आठवड्यांत कलेक्टरच्या अवार्डप्रमाणें, एकरीं ५० रु. ह्या दरानें, नवीन करारनामे रजिस्टर केले जातील.

### आटपाडी सहकारी सेक्रेटरी शिक्षणवर्ग

दक्षिण सातारा जिल्हा सहकारी मंडळाच्या विद्यमानें आटपाडी येथें ता. २०-७-५३ ते १९-९-५३ पर्यंत सहकारी सेक्रेटरी शिक्षणवर्ग भरविणेंत आला. या वर्गाचा उद्घाटन समारंभ मे. ए. डी. कानडे, बी. कॉम., जी. डी. सी. ए., असिस्टंट रजिस्ट्रारसाहेब को. सो. दक्षिण सातारा, सांगली यांचे अध्यक्षतेखालीं साजरा करणेंत आला. या वर्गामध्यें शिक्षण मिळावें या हेतूनें या जिल्ह्यांतील ३२ विद्यार्थ्यांचे अर्ज आले. त्यापैकीं मध्यंतरीं कांहीं अपरिहार्य कारणांमुळें १४ विद्यार्थी वर्ग सोडून गेले. अखेर परीक्षेस १८ विद्यार्थी बसले.

या वर्गातील विद्यार्थ्यांची परीक्षा सहकारी कायदा, कानू, पोटनियम, कूळसंरक्षण व सावकारानियंत्रण कायदा, ॲग्रि. प्रोड्यूस ॲक्ट, सहकारी संस्थांचे जमाखर्च व जनरल सहकार इ. विषयांची ता. १७, १८ व १९ सप्टेंबर १९५३ रोजीं घेण्यांत आली. वर्गाचा समारोप-समारंभ ता. १९-९-१९५३ रोजीं सायंकाळीं ४ वाजतां श्री. रस्तुमराव नानासाहेब देशमुख, चेअरमन आटपाडी युनियन, यांचे अध्यक्षतेखालीं पार पडला.

आंतरराष्ट्रीय कोर्टापुढील प्राचीन खटला—इंग्लिश खाडींतील चॅनल ऑयलंडस जवळ दोन खडक आहेत. ते भरतीच्या वेळीं दिसत सुद्धां नाहींत. पण ओहोटीच्या वेळीं मच्छीमारांसाठीं त्यांचा चांगला उपयोग होतो. हे खडक ब्रिटनच्या मालकीचे कीं फ्रान्सच्या मालकीचे, हा वाद गेलीं १,००० वर्षें चालू आहे. हेग येथील आंतरराष्ट्रीय कोर्टांत आतां तोंडी पुरावा घेण्याचें काम चालू झालें आहे.

## सांगली येथील परिषदेचें मार्गदर्शन

( श्री. पु. पां. गोखले, अध्यक्ष, दि कराड अर्बन को. बँक लि. )

गेलीं चौदा वर्षें महागाईचा वनवास काढूनहि स्वास्थ्याचें रामराज्यच काय, पण त्याचा मागमूसहि जनतेला अजून कोठें आढळत नाहीं; उलट बेकारी–भिकारचाळयांचे आहिरावण–महिरावणासारखें खायला उठलेलेंच भोंवतालीं नाचत असतांना दिसतात. आणि माणसाच्या प्राप्तीचें मान किमान रुपये शंभर तरी सरकारी योजकांच्या आपेक्षेप्रमाणें वाढावयाच्या ऐवजीं करांचें नि कर्जबाजारीचें प्रमाण वाढलेलें आढळतें; इतकें कीं, नवीन उद्योगधंद्याची उभारणी करण्याचें कोणासहि साहस वाटतें व गेल्या पांच वर्षांत उभारलेलेच काय, पण अनेक जुने उद्योगधंदेहि आपला टिकाव पूर्वीसारख्या इतमानानें कसा करतील, हा एक काळजीचा विषय होऊन बसतो.

### सहकारी वृत्तीचें तरुण पिढीला वळण

मध्यमवर्गीय तरुण पिढीसाठी आवश्यक व्हावयास हवी त्या शैक्षणिक कर्जाच्या योजनेची मातब्बरी तज्ज्ञांस आतां पटूं लागली आहे. अशाच तज्ज्ञांशीं होणाऱ्या वाटाघाटींतून आणखीहि एक आवश्यकता पुढें येत असून तिचा आपण सर्वांनीं गंभीरपणें विचार करण्याची वेळ आली आहे. भारतांत जर सर्वोदयी सहकारी समाज संघटित करावयाचा आहे तर त्या मनोवृत्तीचें आणि आर्थिक व्यवहारांत ती मनोवृत्ति आचरणशुद्ध राखण्याचें वळण तरुण पिढीला लागणें आवश्यक आहे. सातारा जिल्ह्यांतील कऱ्हाडसारख्या व्यापारी नि शैक्षणिक आघाडीवर असलेल्या शहरांत सहकार–शिक्षणालयाची सोय केली किंवा झाली, तर दर पांच हजार वस्तीच्या खेड्यापाड्यांत देखील सहकारी पतपेढी निघून तिची जोपासना शास्त्रशुद्ध पायावर होण्यास मोठा हातभार लागणार आहे.

" कोणाही जिवाचा न घडो मत्सर । " हेंच सर्वेश्वरपूजनाप्रमाणें सहकाराचें ब्रीद आहे. बँकेचा प्रत्येक सभासद आपल्या कुटुंबांतील घटक आहे, असा जिव्हाळा निर्माण करण्यावर बँकेच्या सर्व कार्यप्रणालीचा भर असतो. कोणाचाहि " मीपणा " गौण, पण सर्वांचा " आम्हीपणा " प्रमुख, असें वातावरण सतत नांदावें, म्हणूनच सभासदांच्या वैयक्तिक भेटीगाठींचे योग साधून त्यांचीं दैनंदिन सुखदुःखें आणि अडीअडचणी समजून घेण्याचा बँक प्रयत्न करीत असते. नौकरवर्गाला आपुलकीनें विश्वासांत घेऊनच नियामक मंडळ कामाला लावतें, एवढेंच नव्हें तर त्यांच्या सेवास्वास्थ्याचीहि काळजी बँक करते, वगैरे गोष्टी आतां एवढ्या स्पष्ट आहेत कीं, " कामये दुःखतप्तानां सम्यानामार्तिनाशनम् । " हें चांगल्या बँकेचें जणुं ध्येयवाक्यच आहे, असें समजण्यांत येतें.

### नागरी मध्यमवर्गाबाबत कर्तव्य

भारतांतील लोकशाही स्वराज्य प्रामुख्यानें शेतकरी–कामकरी स्वराज्य असणार–होणार आणि म्हणूनं त्या त्या वर्गाच्या उन्नतीसाठी सहकारी खातें आणि पुरवठ्याच्या मध्यवर्ती बँका चालणार हें साहजिक व क्रमप्राप्तच आहे. तरीहि नागरी मध्यमवर्ग हा राष्ट्रांतील दुर्लक्ष्य वर्ग नसून त्याच्या वळकटीला सहानुभूतिपूर्वक हातभार लावणें हें राष्ट्रांतील अर्थव्यवस्थेचें व कारभार कुशलतेचें कर्तव्य आहे, हें सांगली परिषदेनें ठामपणें प्रतिपादून नागरी सहकारी बँकांची प्रगति व्हावी म्हणून या बँकांच्या कामकाजाकडे विशेष लक्ष देणारा एक स्वतंत्र अधिकारी नेमण्यांत यावा नि पुरवठ्याच्या मध्यवर्ती बँकांनीं आपल्या पुंजींतून पंधरा टक्के तरी नागरी सहकारी बँकांना पुरवठा करित जावा; नाहींपेक्षां, नागरी सहकारी बँकांना पैशाचा पुरवठा करण्या–होण्यासाठी कांहीं स्वतंत्र योजना करावी लागेल कीं काय, असा विचार मांडून त्यासाठी सांगली परिषदेनें एक समिति नेमली आहे.

नागरी सहकारी बँकांचें महत्त्व यत्किंचितहि कमी होतां कामा नये, या धोरणाचा ठामपणें पुरस्कार करून सरकारनें सदर बँकांसंबंधीं काय काय करावयास पाहिजे हेंहि सांगली परिषदेनें स्वच्छ केलें आहे. नागरी मध्यमवर्गीयांची मिळकत, बचत, किफायत या बाबतींतला पाढा ' न वाचलेला बरा ! ' अशा अवस्थेंत असल्याकारणानें सरकारला कर्तव्यप्रवृत्त करावयास सांगली परिषद विसरली नसली, तरी मार्गदर्शन करणें किंवा घळणावर आणणें यापलीकडे दैनंदिन जीवनांत आणि नागरिक हक्कांत सरकारी यंत्रणेनें जास्त तसदी घेऊं नये, असाच रोख लेखापरीक्षकांच्या नेमणुकीसंबंधींचें आपलें शिफारसी–परिपत्रक खात्यानें मागें घ्यावें वगैरे ठरावांच्या द्वारा सांगली परिषदेनें ठेवला होता. अर्थात् हें सर्व करतांना नागरी बँकांच्याहि जबाबदाऱ्या सांगली परिषदेला सांगणें कर्तव्यप्राप्तच होतें. म्हणून बँकेच्या नौकरवर्गाबाबत सेवानियमावलि तयार करून त्यांच्या सेवास्वास्थ्याचे निधि उभारण्याचा उपक्रम एक वर्षाच्या आंत नागरी सहकारी बँकांनीं करावा; बँकेचा नौकरवर्ग पात्रतासिद्ध असावा व त्या पात्रतासिद्धीसाठीं बँकांनीं त्यांची सोय करावी; सहकारी परिषदांस बँकेच्या जबाबदार अशा नौकरवर्गांतील कोणीतरी प्रतिनिधि म्हणून धाडित असावें; भागनफा-जुळवण-निधि भागभांडवलाच्या ६¼% पर्यंतच संचित करण्याऐवजीं तो २०% पर्यंत बँकांनीं करावा आणि तशी सरकारनें कायदेशीर परवानगी द्यावी, असेहि ठराव सांगली परिषदेनें केले आहेत.

### डायरेक्टरांची पात्रता

फार काय, नियामक–मंडळावर निवडून येणाऱ्या मंडळीला पात्रतासिद्ध नोकरवर्गाकडून काम करवून घेण्यापासून स्वतः संशयातीत चारित्र्यानें कारभार करीत असल्याचा निर्वाळा जनतेला मिळण्यापर्यंत कांहींतरी " योग्यता " असावी, म्हणून सांगली परिषदेंत एका ठरावाच्या निमित्तानें बराच उहापोह झाला आणि सदर योग्यताप्रामाण्याबद्दल एकमत व्हावयास संधि सांपडावी म्हणून सदर ठराव पुढील वर्षाच्या परिषदेसाठीं राखून ठेवण्यांत आला. पेढीशास्त्राचीं मूलभूत तत्त्वेंच नियामक मंडळावर काम करूं इच्छिणाराला ठाऊक असून चालत नाहींत, तर लोकशाहीच्या दृष्टीनें तशा जाणत्यांचा सहकार समाजांतील सर्व थरांतून मिळविण्याची कुवत त्याला असावी, मध्यमवर्गीय व गरीबींतील मंडळींच्या जीवनाशीं नि कर्जदारीच्या कुचंबणेशीं त्याला सहानुभूतीनें समरस होऊन मार्ग काढण्याची दृष्टि असावी, सभासदांच्या चरित्राकडे व चारित्र्याकडे जिव्हाळ्यानें लक्ष ठेवण्याची कुवत त्याचेजवळ हवी, नियामक मंडळावर निवडून आल्यावर जामीन न होण्याइतका आणि शक्य तर कर्जहि न काढण्याइतका संयम राखण्याचा निर्बंध त्यानें पाळावा ( नियामक मंडळाच्या सभासदांचीं कर्जें फक्त सर्वसाधारण सभेनेंच मंजूर करावींत, असा दण्डक घालण्यांत यावा, अशा सूचना पेढीशास्त्राचे आधुनिक ग्रंथकार करूं लागले आहेत ), आपण निवडून आल्यावर पुढें होणाऱ्या आपल्या कालखंडांतील नियामक–मंडळाच्या निवडणुकींत चुरस नि हेवेदावे यांचा चुकूनसुद्धां प्रादुर्भाव होऊं नये म्हणून निवडणूक–प्रचाराच्या सूचक प्रकारापासूनहि त्यानें अलिप्त असावें, अशा योग्यताप्रामाण्याच्या कितीतरी गोष्टी तेथें चर्चिल्या गेल्या.

## लोकशाहींतील सुलतानशाही

लोकशाहीच्या परिपोषांत अलिखित पण मनाच्या नैतिक ठेवणीनें पाळलेल्या निर्बंधाला मोठें महत्त्व असतें. ज्यांना लोकशाहीच मान्य नाहीं अगर नाइलाज म्हणूनच लोकशाहीचा शब्दोच्चार ज्यांना करावा लागतो, अशांच्याकडून उच्च पातळीवरील प्रथापरंपरांचें विडंबन कायद्याच्या नि पोटनियमांच्या शब्दच्छलानें करण्यांत फुशारकी मारली जाते. सत्ताधारी झालों कीं, "आम्हीं हवें तसें करणार" हें बुद्धिस्वातंत्र्य नसून जुन्या सुलतानशाहींतील बुद्धीचा तो वारसा आहे, एवढाच त्याचा अर्थ असतो. लोकशाहीच्या मातबर पालकांना भारताच्या या संक्रमणकाळांत सदर वृत्तीबद्दल अत्यंत दक्ष राहिलें पाहिजे. आपल्याच सभासद–बंधूबद्दल धिक्काराची भाषा बोलणारी आणि तरतमभावानें देखील त्याचा सहकार करण्याइतका मनाचा मोठेपणा नसणारी मंडळी, एका बाजूनें सहकारी संस्थांच्या संचालनेच्या शेखी मिरवीत मिरवीत सत्ताकेंद्रावरून सोयीसवलती मिळाव्यात म्हणून कायदेशीर शब्दांची टांकसाळ दुसऱ्या बाजूनें घालतांना पाहिली, म्हणजे लोकशाहीशीं समरस झालेल्या सेवाबुद्धींचा गोंधळ होतो. तो तसा होऊं नये म्हणून लोकशाहीच्या पुरस्कर्त्यांनीं आपलें प्रत्येक पाऊल जपून टाकण्याची वेळ आली आहे.

सहकारी कायद्यांत सुधारणा होण्याचा रंग असून सहकाराच्या सर्व अंगोपांगांचा साकल्यानें विचार व्हावा आणि सर्वांगीण संमीलित सहकाराच्या सुकरतेनें सर्वोदयी समाजाच्या बांधणीस मदत व्हावी, म्हणून होणाऱ्या कायदादुरुस्तीकडे सर्व सहकारी बंधूंनीं बारकाव्यानें लक्ष घालणें आवश्यक आहे. यापेक्षाहि अखिल भारताचा एकजिनसी पण सर्व–विकास–क्षम सहकारी कायदा होईल तर तो अखिल भारतीय सहकारी पेढ्यांच्या संघटनेस मदत करीलच; पण भारतीयत्वाची भावना सर्वत्र मुरवून उंचविण्यास साहाय्यभूत होईल अशी अपेक्षा आहे. ज्यांचा एवढा मोठा अधिकार आहे, त्यांनीं प्रयत्नांस लागावें !


दि व्हल्कन इन्शुअरन्स कं. लि.

—पुणें शाखा—

१७९, कर्वे बिल्डिंग, लक्ष्मी रोड.


आग, मोटार, अपघात व वर्कमेन्स कॉंपेन्सेशन ह्यांचे विमे स्वीकारणारी प्रमुख स्वदेशी कंपनी.

एजन्सी व इतर माहितीसाठीं चौकशी करा :


ब्रँच सेक्रेटरी.

किर्लोस्कर

पॉवरवर चालणारे



“ शरद चरक ”



वसंत नं. ३ चरक

उसाचे चरक

हंगाम नजीक आला !

—सविस्तर माहितीसाठी आजच लिहा.—

किर्लोस्कर बंधु, लि., किर्लोस्करवाडी (जि. द. सातारा)

दि प्रेसिडेन्सी इंडस्ट्रियल बँक लि.

( शिड्यूल्ड बँक )

प्रेसिडेन्सी बँक बिल्डिंग

पुणें २. ( टे. नं. २७६३ )

| | | |
|---|---|---|
| अधिकृत, विक्रीस काढलेलें व खपलेलें भांडवल | रु. | १०,००,००० |
| जमा झालेलें भांडवल | रु. | ७,२४,९१० |
| खेळतें भांडवल | रु. | ७५,००,००० |

मुंबई शाखा:—कॉमनवेल्थ बिल्डिंग, ८२, मेडोज स्ट्रीट, मुंबई १

श्री. ग. रा. साठे, अध्यक्ष. श्री. वा. ग. बापट, उपाध्यक्ष.

बँकिंगचे सर्व व्यवहार केले जातात.

श्री. गो. धों. जोगळेकर बी. ए. (ऑ.), बी. कॉम., एलएल. बी., मॅनेजर.

श्री. सी. टी. चितळे मॅनेजिंग डायरेक्टर. टे. नं. २६०७

## पंचवार्षिक योजनेची प्रगति

अधिकृतपणें १ एप्रिल, १९५१ रोजीं सुरू झालेल्या पंचवार्षिक योजनेचें तिसरें वर्ष चालूं आहे. गेल्या दोन वर्षांच्या अवधींत, धान्योत्पादनांत वाढ, अधिक औद्योगिक उत्पादन, अनेक योजनांचा प्रारंभ, इत्यादि बऱ्याच गोष्टी साध्य झाल्या आहेत.

या योजनेवर एकंदर २०६९ कोटी रुपये खर्च व्हावयाचा असून पहिल्या दोन वर्षांत ५८४ कोटी रुपये खर्ची पडले आहेत. चालू वर्षी एकंदर सुमारें ४१३ कोटी रुपये खर्च होतील.

कोणतीहि राष्ट्रव्यापी योजना कार्यवाहींत असतांना तिजवर विविध गोष्टींचा परिणाम होत असतोच. भारतीय योजनाहि आतां-पर्यंत दोन सुस्पष्ट टप्प्यांतून गेली आहे. योजना तयार झाली तेव्हां भारतांत चलनवाढीची प्रवृत्ति प्रामुख्यानें दिसत होती. परंतु लवकरच चलनसंकोचाचें वातावरण आलें व फेब्रुवारी १९५२ पासून किंमतींत फारच घट झाली. याचा परिणाम सरकारी महसूल, तसेंच भांडवल गुंतवणूक व रोजगारीवर झाला. अलिकडे भाववाढ दिसत असली तरी ती चलनवाढीच्या स्वरूपाची म्हणतां येत नाहीं.

एकंदरींत योजनेची प्रगति समाधानकारक होत असली तरी कांहीं क्षेत्रांतील खर्च ठरल्यापेक्षा बराच कमी झाला असून त्या क्षेत्रांत योग्य ती जुळवाजुळव करण्याची गरज वाटत आहे.

### रोजगारीची शक्यता

नियोजनांतील रोजगारविषयक अंगाकडे सरकारचें सध्यां लक्ष वेधलेलें आहे. देशांतील बेकारीचा आंकडा पुरेसा अचूक उपलब्ध नाहीं; परंतु एकूण नोकऱ्यांच्या संख्येंत तुटवडा यापेक्षा रोजगारीच्या संधींतील अपुरी वाढ हें या प्रश्नाचें स्वरूप दिसतें. यासाठी नागरी भागांतील बेकारीबाबत ११ कलमी योजना मध्य व राज्य सरकारांपुढें आहे. याखेरीज सुमारें ८०,००० वाकबगार व्यक्तींना व सुमारें ३ लक्ष बिन-वाकबगारांना रोजगारीची शक्यता असलेली देशव्यापी राष्ट्रीय शेती विस्तार संघटना सरकारनें कार्यवाहींत आणली आहे. याखेरीज शैक्षणिक सुधारणांसारख्या दीर्घ मुदतीच्या योजनांचाहि विचार चालूं आहे.

### सामाजिक व आर्थिक सुधारणा

या योजनेच्या सामाजिक व आर्थिक अंगांसंबंधीं सरकारनें अनेक उपाययोजना चालू केल्या असून, त्यांत जमीनसुधारणेच्या विविध योजना, वारसा कर विधेयक, समाज विकास योजनांसारख्या ग्रामीण विकासाच्या व्यापक योजना, इत्यादींचा अंतर्भाव होतो.

आर्थिक व समाजसेवेच्या सर्व क्षेत्रांतील मूलभूत विकास साधणें हा पंचवार्षिक योजनेचा हेतु आहे. धान्योत्पादनवाढीची गरज लक्षांत घेऊन त्यांत शेतकी आणि समाजविकास यांबाबत योजनांवर भर दिला आहे. या योजना व पाटबंधारे आणि वीज-निर्मिति केंद्रें यासाठी मिळून व एकूण खर्चाच्या सुमारें ४४·६ टक्के रक्कम ठेवली आहे. बाकीच्या खर्चांत वाहतूक आणि दळणवळण (२४ टक्के), उद्योगधंदे (८·४ टक्के), पुनर्वसाहत (४·१ टक्के), सामाजिक कार्यें (१६·४ टक्के) आणि संकीर्ण (२·५ टक्के) अशी विभागणी आहे.

### धान्योत्पादन

गेल्या दोन वर्षांत योजनेच्या अंमलबजावणीबाबत सर्व क्षेत्रांत प्रगति आहे. १९५१-५२ मध्यें २०·५ लक्ष एकर जादा जमिनीस छोट्या पाटबंधाऱ्यामुळें पाणी मिळालें. मध्यवर्ती ट्रॅक्टर संघटनेनें १९५१-५२ व १९५२-५३ मध्यें अनुक्रमें २·५ व १·६ लक्ष एकर पडिक जमीन लागवडीखालीं आणली. अन्नधान्योत्पादनांत बरीच वाढ झाली. ऑक्टोबर १९५२ मध्यें सुरू केलेला समाज विकास योजनांचा कार्यक्रम प्रगतिपथावर असून या २ ऑक्टोबरपासून राष्ट्रीय शेतकी विस्तार संघटना हा अधिक व्यापक कार्यक्रम सुरू करण्यांत आला.

### पाटबंधारे व विद्युत्‌निर्मिति

पाटबंधारे आणि वीजनिर्मितीच्या अनेक योजना विविध कार्यकारी स्वरूपाच्या असून, पंचवार्षिक योजनेच्या पहिल्या दोन वर्षांत त्यांसाठीं एकूण १९० कोटी रुपये खर्च झाले आहेत. त्यामुळें आतांपर्यंत १४·२ लक्ष एकर जमिनीस फायदा झाला आहे. वीजनिर्मितीचे क्षेत्रांतहि ठरलेल्या लक्ष्याहून अधिक वीज निर्माण करण्यांत आली.

भाक्रा-नान्गल योजनेंतील पाण्याचा ओघ बदलणारे ५० फुटी व्यासाचे बोगदे पुरे होत आले आहेत. दामोदर धरण योजनेंतील बोकॅरो औष्णिक विद्युत्‌निर्मिति केंद्रहि पुरें होत आलें आहे. तिलाईया धरणाचे कामहि संपलें आहे. कोनार धरणाचेंहि बरेंचसें काम पुरें होत आलें आहे. हिराकूड धरण योजनेंतील एका बंधाऱ्याचें बांधकाम संपत आलें असून, इतर बंधाऱ्यांचीं कामें झपाट्यानें उरकरण्यांत येत आहेत. तुंगभद्रा योजनेंतील धरणाचें मद्रास आणि हैद्राबाद या दोन्ही बाजूंकडील काम पुरें होण्याच्या बेतांत असून उजव्या तीराकडील कालव्यांच्या बांधकामांत बरीच प्रगति झाली आहे. मयुराक्षी, काक्रापार आणि लोअर भवानी या योजनांच्या बांधकामांतहि पुष्कळच प्रगति झाली आहे.

### उद्योगधंदे : सरकारी क्षेत्र

सरकारी क्षेत्राच्या औद्योगिक विकासांत सिंद्रीखत कारखाना, चित्तरंजन येथील रेल्वे इंजिनांचा कारखाना, भारतीय टेलिफोन कारखाना, इंडियन रेअर अर्थस् लि. व उत्तर प्रदेश सरकारचा सूक्ष्म यंत्रनिर्मितीचा कारखाना यांचा अंतर्भाव असून वरील सर्व कारखान्यांत उत्पादनास आरंभ झाला आहे. म्हैसूर आयर्न ॲण्ड स्टील वर्क्स हा कारखानाहि पुरा होत आला आहे. सरकारी क्षेत्रांतील हिंदुस्थान शिपयार्ड लि. नें १९५२ मध्यें तीन जहाजें तयार केलीं असून, दोन जहाजांच्या बांधणीचें काम सध्यां चालू आहे. पेनिसिलिन व डी. डी. टी. कारखाने १९५४ मध्यें उभारले जाण्याची अपेक्षा आहे. पोलाद कारखाना उभारण्यासंबंधांत एका जर्मन फर्मशीं करार केला असून चार वर्षांत उत्पादनास आरंभ होण्याची अपेक्षा आहे. चित्तरंजन कारखान्यांत पहिल्या दोन वर्षांत ५३ इंजिनें तयार करण्यांत आलीं असून अनेक रेल्वे डबेहि तयार करण्यांत आले.

### खाजगी क्षेत्र

पंचवार्षिक योजनेंतील खासगी क्षेत्रांतील सिमेंट, लोखंड व पोलाद, अल्युमिनियम, खतें, हेव्ही केमिकल्स यांसारख्या एकूण ४२ धंद्यांच्या वाढीचा तपशील आंखण्यांत आला आहे. त्यांतच तेलशुद्धीकरणाचे कारखाने व कांहीं औषधीनिर्मितीचे कारखानें स्थापन करण्याच्या योजनेचा समावेश आहे.

# दि रत्नाकर बँक, लि.

(कोल्हापूर येथें नोंदलेली व भागीदारांची जबाबदारी मर्यादित असलेली)

स्थापना : १९४३

मुख्य कचेरी: भाऊसिंगजी रोड, कोल्हापूर

शाखा—सांगली, शाहूपुरी, मिरज, जयसिंगपूर.

| | | रु. |
|---|---|---|
| अधिकृत भांडवल | ... | १०,११,००० |
| विक्री केलेलें शेअर भांडवल | ... | १०,०६,६०० |
| रोख वसूल शेअर भांडवल | ... | ५,०३,३०० |
| रिझर्व्ह व इतर फंड | ... | १,०८,४०० |
| खेळतें भांडवल (अंदाजें) | ... | ४७,६६,००० |

—यथावत् बँकिंग व्यवहार केले जातात—

श्री. बी. बी. पाटील, B. A., LL. B., वकील, सांगली, चेअरमन

श्री. गंगाराम सिद्दाप्पा चौगुले, कोल्हापूर, व्हा. चेअरमन

एल्. एन्. शहा, B. Com., C. A. I. I. B. मॅनेजर

स्थापना १९३६

# युनायटेड वेस्टर्न बँक, लिमिटेड, सातारा

[शेड्यूल्ड बँक]

पॅलेस स्ट्रीट, सातारा.

शाखा—मुंबई फोर्ट, मुंबई गिरगांव, पुणें, नाशिक व बार्शी.

ता. ३१-१२-५२ अखेर

| | | |
|---|---|---|
| अधिकृत भांडवल | रु. | १०,००,००० |
| वसूल भांडवल | रु. | ६,६९,९२५ |
| रिझर्व व इतर फंड्स | रु. | १,७९,००० |
| ठेवी | रु. | ६३,००,००० |
| एकूण खेळतें भांडवल | रु. | ७८,००,००० |

मुदत ठेवीवरील व्याजाचे दर :

| १ वर्ष | दोन वर्षे | तीन वर्षे | ५ वर्षें |
|---|---|---|---|
| रु. २-८-० | रु. २-१२-० | रु. ३-०-० | रु. ३-८-० |

दहा अगर अधिक वर्षे रु. ४-०-० (चार फक्त)

| | | |
|---|---|---|
| सेव्हिंग्ज बँक | दरसाल दर शेकडा | १-८-० |
| सेव्हिंग्ज डिपॉझिट | ,, | १-०-० |
| चालू डिपॉझिट | ,, | ०-८-० |

सर्व तऱ्हेचे बँकिंगचे व्यवहार केले जातात.

सी. ह. जोशी, बी. ए., बी. कॉम्., मॅनेजर.

शं. ह. साठे, बी. ए., एलएल. बी., चेअरमन

# दि बॉम्बे स्टेट को-ऑपरेटिव्ह बँक लिमिटेड

स्थापना १९११

मुख्य कचेरी : ९, बेक हाऊस लेन, फोर्ट, मुंबई.

टेलिफोन नं. २५३६१, ३१,६८६ | पोस्ट बॉक्स नं. ४७२, तारेचा पत्ता : फार्मर्सबँक

ह्या बँकेंत गुंतविलेला पैका शेतकरीवर्ग व सर्व प्रकारच्या सहकारी संस्था ह्यांच्याच उपयोगासाठी दिला जातो.

भरपाई झालेलें भांडवल

| | |
|---|---|
| भागीदारांतर्फे | रु. ३३,९९,१५० |
| मुंबई सरकारतर्फे | रु. १६,००,००० |
| | रु. ४९,९९,१५० |
| गंगाजळी व फंड | रु. ५४,३३,९०० |
| ठेवी | रु. ९,२५,२६,५०० |
| खेळतें भांडवल | रु. १२,२९,०२,८०० |

## १६ जिल्ह्यामध्यें ६७ शाखा

भारतांतील प्रमुख शहरीं हुंड्या, बिलें वगैरे वसुलीची व्यवस्था केली जाते. सर्व प्रकारच्या ठेवी स्वीकारल्या जातात. शर्तींबद्दल चौकशी करावी.

वा. पु. वर्दे

ऑनररी मॅनेजिंग डायरेक्टर.

दि

# युनायटेड कमर्शिअल बँक लि.

कलकत्ता.

| | | | |
|---|---|---|---|
| अधिकृत भांडवल | ... | ८ | कोटी रु. |
| खपलेलें भांडवल | ... | ४ | कोटी रु. |
| वसूल भांडवल | ... | २ | कोटी रु. |
| रिझर्व्ह फंड | ... | ७५ | लक्ष रु. |

: बोर्ड ऑफ डायरेक्टर्स :

जी. डी. बिर्ला (चेअरमन)

| | |
|---|---|
| ईश्वरीप्रसाद गोयंका, व्हाइस चेअरमन | रमणलाल जी. सरय्या, व्हाइस चेअरमन |
| अनंत चरण लॉ | महादेव एल. डहाणूकर |
| बैजनाथ जालन | मदनमोहन आर. रुइया |
| गोविंदलाल बंगूर | मोहनलाल एल. शहा |
| पी. डी. हिमतसिंगका | मोतीलाल तापुरिया |
| रामेश्वरलाल नोपानी | नवीनचंद्र मफतलाल |

: जनरल मॅनेजर :

बी. टी. ठाकूर

भारत, बर्मा, पाकिस्तान आणि मलाया येथील महत्त्वाच्या शहरीं व गांवीं बँकेच्या शाखा असल्यानें आणि बँकेच्या सबंध जगभर एजन्सीच्या व्यवस्था असल्यानें भारतांत व भारताबाहेर अत्युत्कृष्ट बँकिंगची सेवा करण्यास बँक सुसज्ज आहे.


हें पत्र पुणें, पेठ शिवाजीनगर घ. नं. ९१५।१ आर्यभूषण छापखान्यांत केशव गणेश शारंगपाणी यांनीं छापिलें व श्रीपाद वामन काळे, बी. ए. यांनीं 'दुर्गाधिवास', ८२३ शिवाजीनगर (पो. ऑ. डेक्कन जिमखाना) पुणें ४ येथें प्रसिद्ध केलें.